# प्रास्ताविक

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे नवभारताच्या घटनेचे शिल्पकार लोकशाहीचे त्राते मानवी स्वातंत्र्याचे कैवारी व दलितांचे उध्दारकर्ते म्हणून सर्व विश्वाला ज्ञात आहेत. ते एक आंतरराष्ट्रीय किर्तीचे विद्वान होऊन गेले. त्यांनी दलित दुर्बलासाठी आपल्या हयातीत अनेक सामाजिक चळवळी यशस्वी केल्या.ह्या चळवळी करीत असता त्यांना काही विश्वासू सहकारी मिळाले अशाच एका विश्वासू सहकार्या पैकी कै.दादासाहेब शिर्के ( सन १९०७-१९८५ ) हे कोल्हापूर भागात होऊन गेले.

दादासाहेब शिर्के राजर्षि शाहू छत्रपति यांच्या सामाजिक कार्याने भारावलेले दलित नेते होते. शाहू महाराजांच्या कृपा आशिर्वादाने दादासाहेब शिर्के यांना मुंबईला वृत्तपत्रिय शिक्षणासाठी पाठविले होते. सन १९२२ ला शाहू छत्रपतीचे निधन झाले व नंतर कोल्हापूरचे छत्रपति राजाराम महाराज यांनी सन १९२२-१९४० या कालात राज्यकारभार केला. दादासाहेब शिर्के मुंबईहून परत आल्यानंतर शाहू महाराजांचे अपूरं राहिलेले सामाजिक कार्य पुढे नेण्यासाठी त्यांनी गरुड नावाचे साप्ताहिक सन १९२६ ला सुरु केले ते १९५४ पर्यन्त होते.' सन १९५७-ते १९६२ या कालखंडात दादासाहेब शिर्के आमदार होते. तसेच ते उत्तम वक्ते व लेखक होऊन गेले.डॉ.आंबेडकरांच्या सामाजिक चळवळीचे ते एक सक्रीय कार्यकर्ते होते.

अशा या अष्टपैलू व्यक्तीमत्वाचा हा एक प्रामाणिकपणे केलेला अभ्यास आहे. ह्या अभ्यासासाठी गरुड साप्ताहिकाच्या फाईल्स ,मुंबई व महाराष्ट्र विधान सभेचे डिबेटस्,त्यांनी लिहिलेले ग्रंथ व इतर अस्सल साधनांचा उपयोग केलेला आहे. तसेच त्यांच्यासंबंधी इतर ग्रंथातून आलेली माहिती, गौरव अंक इ.दुय्यम साधनांचाही उपयोग केला आहे.

हा लघू शोध-प्रबन्ध तयार करत असताना मला अनेक व्यक्ती व संस्था यांचेकडून सहकार्य व प्रोत्साहन मिळाले. त्यांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो.

अनेक अडचणीमुळे या अभ्यासापासून परावृत्त होण्याचे विचार मनात येत होते अशा अनेक क्षणी माझे संशोधक मार्गदर्शक डॉ.बी.डी.खणे यांनी सावरले आहे. त्यांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले म्हणून हे काम मी करु शकलो म्हणून त्यांच्या ऋणानुबंधात रहाण्यातच मला विशेष आनंद आहे. इतिहास विभाग प्रमुख डॉ.व्ही.एस.कदम आणि या विभागातील डॉ.बी.आर. कांबळे, डॉ.ए.आर.भोसले, डॉ.एम.ए.लोहार, डॉ.एम.पी.पाटील यांनी जे सहकार्य दिले त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

प्रस्तुत अभ्यासासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी, शिक्षण महर्षी प्राचार्य एम.आर.देसाई, गोपाल कृष्ण गोखले कॉलेज, कोल्हापूर या माझ्या कॉलेजचे प्राचार्य सी.आर.गोडसे आणि जिमखाना चेअरमन प्रा.जयकुमार देसाई यांनी मला जे मौलिक सहकार्य व प्रोत्साहन दिले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

दा.म.शिर्के यांचे चिरंजीव, श्री.वसंतराव शिर्के यांनी आपल्या संग्रहातून गरुड, शांतिदूत, प्रबुध्द भारत, भारत भूषण चे अंक व दा.म.शिर्के यांनी लिहिलेली पुस्तके उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. त्याच बरोबर या साप्ताहिकाचे अंक मिळवून दिल्याबद्दल श्री.नामदेवराव सरनाईक यांना मनपूर्वक धन्यवाद. श्री.डी.एस.कांबळे, टी.एम.कांबळे यांनी ही सहकार्य केल्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

गोपाल कृष्ण गोखले कॉलेज, कोल्हापूर या माझ्या कॉलेजचे ग्रंथपाल श्री.डी.आर.बोन्द्रे यांनी बहुमोल सहकार्य केले त्यांचाही मनपूर्वक आभारी आहे. महाराष्ट्र राज्याच्या मुंबई विधान भवन ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री.डी.एस.चव्हाण, श्री.बा.बा.वाघमारे, श्री.पी.एच.धोपट यांनी डिबेटस संशोधनाच्या कामी सहकार्य केल्याबद्दल त्यांचाही मी मनपूर्वक आभारी आहे. मुंबई लोकसेवा आयोगाचे ग्रंथपाल,

UNIVERSITY KOLHAPUR

श्री रमेश कुरणे यांच्याही सहकार्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे. दैनिक पुढारीचे संपादक व दैनिक सत्यवादीचे संपादक व त्यांच्या सहकार्यांनी मला वेळच्यावेळेला वृत्तमानपत्राचे अंक शोधून दिले त्याबद्दल त्यांचा मनपूर्वक आभारी आहे.

माझ्या कॉलेजचे प्रा.एन.आय. मुश्रीफ,प्रा.विष्णूपंत इंगवले,प्रा.व्ही.बी.कांबळे,प्रा.व्ही.डी.लोखंडे, प्रा.व्ही.बी.सकटे, कस्तुरबा वालचंद कॉलेज, सांगली येथील प्रा.अशोक भटकर ,इ.नी हा प्रबंध पूरा करण्याबद्दल सहानुभूतीपूर्वक प्रोत्साहन दिले त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

माझी आजी,आई,वडिल,मावशी,मामा बहिणा,भाऊ श्रीकांत,शशिकांत कुरणे, अशोक ढाले,सुनीत ढाले व हायस्कूल जीवनातील माझे शिक्षक श्री.बी.वाय .पवार,श्री.बी.डी.कांबळे, श्री.प्रदिप कांबळे यांनी आशिर्वाद व प्रोत्साहन दिले हे उपकार न फिटण्यासारखे आहेत, ते कधी ही माझ्या स्मृती आड होणार नाही आजन्म मी त्यांचा ऋणी आहे.

लिखाण कामात मला माझी पत्नी सौ.सुवर्णा चंद्रकांत कुरणे व श्री.सुभाष सरनाईक यांनी मदत केली त्यांचाही मी आभारी आहे.

या प्रबंधाचे टंकमुद्रण नेटक्या स्वरुपात आणि आत्मीयतेने करुन दिल्याबद्दल श्रीयुत बाळकृष्ण रा.सावंत यांना मनपूर्वक धन्यवाद.

म.फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर ,राजर्षि शाहू महाराज यांच्यावर नितांत प्रेम करणारा एक कार्यकर्ता व दुर्लक्षिले गेलेले हे प्रभावी व्यक्तीमत्व उजेडात आणण्यासाठी अभ्यास करण्याची संधी या प्रबंधाच्या निमित्ताने मला मिळाली. आज या कार्याची पूर्ती होत आहे याचे मनस्वी समाधान वाटते.

सदर लघु शोध-प्रबन्धात जर काही चुका किंवा त्रुटी असतील तर त्यास मी व्यक्तीशा जबाबदार आहे.

कोल्हापूर । दि. 30-12-1993 ( श्री.सी.पी.कुरणे )